मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय
३ रा. मजला, मुख्य इमारत
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे- ४११००५
जा. क्र.:- ३६६१ दि. 9 e 19/12/2023

कार्यालयीन परिपत्रक

विषय:- शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजीनगर येथे उड्डाणपूल बांधणे अंतर्गत उड्डाणपुलावर ध्वनिरोधक बसविणे या कामाचे ठेकेदार मे. द. रायकॉन कन्स्ट्रक्शन, प्रो. प्रा. शक्ती अशोक दरेकर, स. नं. १००२/२, अनंत कान्हेरे पथ, राजेंद्र नगर, पुणे ४११०३० यांना पुणे महानगरपालिकेमध्ये काळ्या यादीत टाकणेबाबत.

संदर्भ:- १) टेंडर क्र. प्रकल्प - २२/२०२२
२) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/६८८ दि. ०७/१२/२०२३.

विषयांकित कामाची निविदा वरील संदर्भ क्र. १ अन्वये या विभागामार्फत काढण्यात आली होती. प्रस्तुत निविदा ठेकेदार मे. द. रायकॉन कन्स्ट्रक्शन (प्रो. प्रा. शक्ती अशोक दरेकर, स. नं. १००२/२, अनंत कान्हेरे पथ, राजेंद्र नगर, पुणे – ४११०३०) यांनी मुख्य अभियंता (प्रकल्प) विभाग या कार्यालयाकडे ऑन लाईन पद्धतीने भरली होती. उपरोक्त निविदेचे 'ब' पाकीट उघडलेनंतर सदर ठेकेदार यांचा सर्वात लघुत्तम देकार (एल-१) ठरला आहे. तथापि सदर ठेकेदाराने खोटी कागदपत्रे सादर करून निविदा मिळविल्याचे या विभागामार्फत करण्यात आलेल्या तपासणी अंती निदर्शनास आले आहे. सदर निविदेमधील अटी शर्तीनुसार ठेकेदाराने बनावट कागदपत्रे दाखल करून निविदा मिळविल्याचे आढळल्यास अशा ठेकादारांना काळ्या यादीत टाकण्याच्या अटीचा समावेश आहे. सबब, सदर ठेकेदार यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ करण्याबाबतचा मान्यतेचा प्रस्ताव मा. महापालिका आयुक्त यांचेकडे सादर केला असता, त्यास मा. महापालिका आयुक्त यांची संदर्भ क्र. २ च्या ठरावान्वये (ठराव क्र. ६/६८८ दि. ०७/१२/२०२३) मान्यता मिळाली आहे.

ठेकेदार मे. द. रायकॉन कन्स्ट्रक्शन प्रो. प्रा. शक्ती अशोक दरेकर, स. नं. १००२/२, अनंत कान्हेरे पथ, राजेंद्र नगर, पुणे - ४११०३० यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात आले आहे.

(श्रीनिवास बोनाला) 18/12/23.
मुख्य अभियंता (प्रकल्प)
पुणे महानगरपालिका

18-12-23 18/12

प्रत:-
मा. सर्व खाते प्रमुख
मा. उप आयुक्त (झोन १ ते ५)
महापालिका सहाय्यक आयुक्त (१ ते १५)